सकाळ अॅग्रोवन १४
शुक्रवार, ४ जुलै २०२५

# अॅग्रो प्लॅनिंग

## कृषी सल्ला : राहुरी विभाग

### ऊस

ऊस पिकामध्ये सिंचनासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. ठिबक सिंचनाद्वारे दिवसाआड पाणी द्यावे. प्रवाही पद्धतीने सिंचन करताना पाण्याच्या उपलब्धतेनुसार एक आड सरी प्रमाणे पाणी द्यावे.

### कापूस

- पेरणीनंतर कापसाची सर्वसाधारणपणे १० दिवसांत उगवण होते. उगवण न झालेल्या ठिकाणी त्याच वाणाच्या बियाणे वापरून नांग्या भराव्यात. आणि लगेच पाणी द्यावे.
- उगवणीनंतर १५ दिवसांनी प्रत्येक फुलीवर दोन जोमदार रोपे ठेवून उर्वरित रोपे उपटून टाकावीत.

### मूग, उडीद

उगवण झालेल्या पिकांत लागवडीनंतर २० ते २५ दिवसांनी कोळपणी करून घ्यावी.

### बाजरी

उगवणी झालेल्या पिकांत लागवडीनंतर १० दिवसांनी कोळपणी करून घ्यावी.

### तूर

तूर पिकामध्ये मिश्रपीक म्हणून ज्वारी किंवा मका लागवड करावी. त्याचा पक्षीथांबे म्हणून उपयोग होतो.

### मका

- उगवण झालेल्या ठिकाणी गरजेनुसार नांगे भरून घ्याव्यात.
- ८ ते १० दिवसांनी पहिली कोळपणी करून घ्यावी.

### पशुसंवर्धन

- पावसाळ्यात जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.
- स्थानिक भागात कोणत्या प्रकारच्या जंताचा प्रादुर्भाव जनावरांस होतो, याविषयी माहिती करून घ्यावी. जंतांचे प्रकार जाणून घेण्यासाठी जनावरांच्या शेणाची तपासणी करावी. त्यानंतर पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करावा.
- रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी जनावरांना संतुलित आहार द्यावा. जेणेकरून जंतांच्या वाढीला आळा बसून त्यांचे नियंत्रण होईल. जनावरांचा गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर राखावा. वेळोवेळी गोठ्याचे निर्जंतुकीकरण करावे.
- पशुवैद्यकांच्या सल्ल्यानुसार योग्य मात्रेतच औषधांचा वापर करावा.



गोठा कायम स्वच्छ आणि कोरडा राखावा.

०२४२६ २४३२३१
(प्रमुख, कृषी विद्या विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)